■ अनुक्रमणिका ■

- संस्थेचा परिचय
- कमला महाविद्यालय
- ध्येय आणि उद्दिष्ट्ये
- गुणवत्तेची परंपरा
- संलग्नता
- प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन व आवश्यक पात्रता
- प्रवेश रद्द करण्याबाबत नियम
- उपस्थितीविषयक नियम
- विद्यार्थी अपघात व सुरक्षा विमा योजना
- शिस्त व वर्तणूकविषयक नियम
- अंतर्गत तक्रार निवारण समिती
- रॅगिंग प्रतिबंधक नियम
- तक्रार निवारण समिती
- विद्यापीठ विविध कल्याणकारी योजना
- आधार कार्ड क्रमांक
- मतदार कार्ड
- प्रवेश मार्गदर्शन समिती
- अध्यापन माध्यम आणि महाविद्यालयाची वेळ
- करिअर ओरिएंटेड कोर्सेस
- अभ्यासक्रमाची लवचिकता
- विषय निवडीबाबत महत्त्वाची सूचना
- महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षा
- परीक्षा पात्रता व परीक्षा फी
- फी माफी, शिष्यवृत्ती, पारितोषिके व विद्यार्थिनी कल्याण निधी
- कमला महाविद्यालयाची वैशिष्ट्ये व विद्यार्थिनींना पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधा
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- महाविद्यालयाचे शैक्षणिक वेळापत्रक
- विद्यार्थिनींकडून मूल्यमापन
- कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रम
- विविध समित्या
- महाविद्यालय विद्यार्थी परिषद
- माजी विद्यार्थिनी संघ
- शिक्षक पालक संघ
- समुपदेशन केंद्र
- सल्ला केंद्र
- करिअर कट्टा
- वरिष्ठ महाविद्यालय शैक्षणिक शुल्क २०२४-२५
- शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त कोर्सेस प्रमाणपत्र

Vision

Empowerment of women

Mission

- Dissemination of women's education.
- Inculcation of moral values and scientific temper.
- Overall development of personality.

Goals

1. Introduction of Career Oriented courses.
2. Imparting latest academic knowledge in order to make our students successful to face challenges of life.
3. Promotion and enhancement of students' inborn qualities and literary skills.
4. Organization of self supporting Programmes
5. Encouragement to the students for active participation in various curricular, co-curricular, extra-curricular and extension activities.
6. Motivation to the students for further studies and to face various competitive examinations.
7. Enrichment of library by adopting latest Technology.
8. Promotion of use of I.C.T.
9. Organization of various extension activities apart from N.S.S. and N.C.C. for enrichment of values.

Quality Policy

We are uncompromisingly committed to provide quality education, compatible with 'Regional to Global standards, exclusively for women to impart academic excellence, employability and leadership with social concern.

ताराराणी विद्यापीठाचे

कमला कॉलेज, कोल्हापूर

१) संस्थेचा परिचय

हिंदवी स्वराज्य संरक्षिका आणि संवर्धिका, युगस्त्री ताराराणीचे निःस्सीम भक्त कोल्हापूरचे राजे स्व. राजाराम महाराज यांच्या प्रेरणेने व ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक स्व. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या त्यागातून व अथक परिश्रमातून 'ताराराणी विद्यापीठ' ही संस्था १९४५ साली स्थापन झाली. फक्त २२ विद्यार्थिनींनीशी सुरू केलेली ही संस्था अल्पकालावधीतच नावारुपाला आली. प्रिन्स शिवाजी विद्यालय (प्राथमिक शाळा), उषाराजे गर्ल्स हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमला कॉलेज, कुमार भवन, कडगांव असा संस्थेचा शाखा विस्तार झालेला आहे.

२) कमला महाविद्यालय

स्व. डॉ. व्ही. टी. पाटील व त्यांच्या समानशील पत्नी स्व. सौ. सरोजिनीदेवी यांनी त्या काळी आपल्या ४० लाखांपेक्षा अधिक किंमतीच्या सर्व मालमत्तेचा ताराराणी विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या कल्याणासाठी सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ ट्रस्ट निर्माण केला. स्व. सौ. सरोजिनीदेवी यांनी संपूर्ण हयातभर ताराराणी विद्यापीठाची काळजी वाहिली. त्यांनी केलेल्या त्यागाच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे नाव 'कमला' महाविद्यालयास देण्यात आले. या महाविद्यालयात कला शाखेत ११ वी ते पदवीपर्यंत व गृहशास्त्र, योगशास्त्र व इंग्रजी विषयातील पदव्युत्तर पर्यंतचे तर वाणिज्य शाखेत ११ वी ते पदवीपर्यंत व बी.सी.ए. शिक्षणाची सोय आहे. **जून २०१४ पासून महाविद्यालयात बॅचलर ऑफ व्होकेशन** (B.Voc.) **इन १) रिटेल मॅनेजमेंट ॲन्ड आय. टी. २) फूड प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेंट हे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.** पदव्युत्तर स्तरावर डिप्लोमा इन योग थेरपी शिकविण्याची सोय आहे. तसेच विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील (इ. ११ वी ते १२ वी) शिक्षण दिले जाते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. ए. व बी. कॉम हे पदवी अभ्यासक्रम एम. ए. (मराठी) व एम. ए. (हिंदी) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे. सर्व शाखांमध्ये मिळून आज २६५५ विद्यार्थींनी शिक्षण घेत आहेत.

महाविद्यालयाने स्थापनेपासून आजपर्यंत केलेल्या सर्वांगीण प्रगतीची दखल घेऊन विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाविद्यालयास **'कॉलेज वुईथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स'** (सी.पी.ई.) हा विशेष दर्जा मिळाला आहे. देशपातळीवर निवडल्या गेलेल्या १२४ महाविद्यालयातून कमला महाविद्यालयाची झालेली ही निवड विशेष उल्लेखनीय आहे. नॅक, बेंगलोर या संस्थेकडून महाविद्यालयास २०१७ साली 'ए' मानांकन (३.१२ सी.जी.पी.ए.) प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेतील हा मानाचा तुराच होय. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून यु.जी.सी. नवी दिल्लीद्वारे महाविद्यालयास **स्वायत्त** दर्जा प्राप्त झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

३) ध्येय आणि उद्दिष्टये

समाजात उपेक्षित असलेल्या स्त्रीला ज्ञानदान करावयाचे कारण 'एक स्त्री शिकली तर कुटुंब शहाणे होते' या ध्येयाने ताराराणी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थिनींना संपूर्ण शिक्षण देणे व त्यांचा सर्वांगीण विकास करुन त्यांना बौद्धिक, आर्थिक तसेच सामाजिक दृष्टिकोनातून स्वयंपूर्ण बनविणे, स्वआदर व आत्मविश्वास जागृत करुन जीवनाच्या विविध क्षेत्रातील आव्हाने पेलण्यास समर्थ बनविणे हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीने महाराणी ताराराणीचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन सत्शील वर्तन ठेवणे, शिस्त व अनुशासन अंगी बाणविणे आवश्यक आहे. स्व. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजींचे 'प्रति ताराराणी' बनविण्याचे उदात्त स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थिनीने प्रामाणिक प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

४) गुणवत्तेची परंपरा

सर्व वर्गांच्या परीक्षांचे नेत्रदीपक निकाल हे आमच्या महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. सन २०२२-२३ चे उच्च गुणवत्ता सिद्ध करणारे निकाल.

प्रथम वर्ष कला ८८%	प्रथम वर्ष वाणिज्य ८८%
द्वितीय वर्ष कला ८३%	द्वितीय वर्ष वाणिज्य ८९%
तृतीय वर्ष कला ८४%	तृतीय वर्ष वाणिज्य ९२%

५) संलग्नता

महाविद्यालयास अल्पावधीतच शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाकडून 'कायमस्वरुपी संलग्नता' मिळाली. महाविद्यालयास १९८७ साली विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2F व १९९२ साली 12-B या कलमाखाली मान्यता मिळाली आहे.

६) प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन व आवश्यक पात्रता

पात्रता - शासन निर्णय कलम क (३) मधील कला, विज्ञान व वाणिज्य अभ्यासक्रम यामध्ये प्रवेश पात्रता महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाची (इयत्ता १२ वी) उत्तीर्ण किंवा शासनमान्य समकक्ष मंडळाची परीक्षा उत्तीर्ण.

१. विद्यापीठाच्या नियमानुसार व उपलब्ध जागेनुसार गुणवत्तेप्रमाणे बी. ए. भाग १ व बी. कॉम भाग १ या वर्गांना प्रवेश दिले जातील. उपलब्ध जागेपैकी ८०% जागा महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी राखीव राहतील व उरलेल्या २०% जागा इतर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी खुल्या राहतील व त्या जागा विद्यापीठाच्या नियमानुसार भरल्या जातील. तसेच शिवाजी विद्यापीठ व शासन निर्णयानुसार आरक्षण लागू राहील. तसेच माजी

सैनिकांच्या पाल्यांसाठी १०% प्रवेश राखीव ठेवण्यात येतील.

तसेच व्यवस्थापनासाठी १५% जागा अभ्यासक्रमनिहाय ठेवण्यात येतील.

प्रवेश क्षमता :

बी. ए. भाग १ - २२०	बी. कॉम. भाग १ - १२०
बी. ए. भाग २ - २२०	बी. कॉम. भाग २ - १२०
बी. ए. भाग ३ - १२०	बी. कॉम. भाग ३ - १२०

२. बी.ए. भाग १ व बी.कॉम. भाग १

या वर्गामध्ये प्रवेश घेतेवेळी बारावीचे गुणपत्रक अथवा डी.एड्. अभ्यासक्रम पूर्ण झाल्याचे गुणपत्रक अथवा तत्सम समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

३. पात्रता प्रमाणपत्र (Eligbility Certificate)

बी.ए. भाग १/बी.कॉम. भाग १ च्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी महाविद्यालयाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी छापील फॉर्म भरुन सोबत रु. ७५/- फी भरावी. महाराष्ट्राबाहेरील अथवा डी. एड्. परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थिनीस सदरची फी रु. ३००/ राहील व ती प्रवेश घेतेवेळी भरावी लागेल.

४. स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

अन्य विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थिनीस प्रवेश घेतेवेळी पूर्वीच्या महाविद्यालयातील प्राचार्यांचा ना हरकत दाखला व स्थलांतर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रवेश घेतेवेळी स्थलांतर दाखल्यासोबत आवश्यक ती फी भरणे गरजेचे आहे.

५. प्रवेश अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे

१) उच्च माध्यमिक (बारावी) अथवा तत्सम समकक्ष परीक्षा गुणपत्रिका मूळप्रत व तिच्या दोन सत्य प्रती.

२) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन सत्य प्रती.

६. डी.एड्. उत्तीर्ण होऊन बी.ए. भाग १ साठी प्रवेश घेताना जोडावयाची कागदपत्रे

अ) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन सत्य प्रती

ब) डी.एड्. गुणपत्रिका मूळ व दोन सत्य प्रती

क) एच.एस.सी. गुणपत्रिकेची मूळ प्रत व दोन सत्य प्रती

७) प्रवेश रद्द करण्याबाबत नियम

विद्यार्थिनीस प्रवेश रद्द करावयाचा असल्यास

१) कॉशन मनी, लायब्ररी डिपॉझिट, लॅबोरेटरी डिपॉझिट काही अटींवर परत करण्यात येतील.

२) फक्त ट्युशन फी खालील अटींवर परत करण्यात येते.

अ) जर विद्यार्थिनीने शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी प्रवेश रद्द केला असल्यास, ट्युशन फीच्या २५% रक्कम प्रशासकीय शुल्क म्हणून कमी करण्यात येईल.

ब) महाविद्यालयाने निर्धारित केलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यार्थिनीने प्रवेश रद्द करण्याबाबत अर्ज केल्यास ५०% रक्कम कपात करण्यात येईल.

क) प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसानंतर ट्युशन फी परताव्याची मागणी करता येणार नाही.

ड) दुसरीकडे प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थिनीने महाविद्यालयातील प्रवेश बदलल्याबाबत अथवा महाविद्यालय सोडल्याबाबत कळवले नसल्यास पूर्ण सत्राची अथवा वर्षाची फी आकारण्यात येईल.

८) उपस्थितीविषयक नियम

१) विद्यार्थिनीने वर्षातील किमान ८०% तासांना उपस्थित असणे आवश्यक आहे.

२) शासन परिपत्रक क्रमांक टी. ई. एन. ३३९६/७४९८ तां शि.-१ दि. १७ जुलै १९९६ नुसार विद्यार्थिनींची उपस्थिती परीक्षेसाठी पात्र अथवा अपात्र ठरविण्यात येते.

३) ज्या विद्यार्थिनी आपल्या उपस्थितीची किमान टक्केवारी पूर्ण करणार नाहीत त्यांना परीक्षेस बसण्यास अपात्र ठरविण्यात येईल व त्यांच्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी त्यांचे स्वत:वर राहील.

९) विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी अपघात व सुरक्षा विमा योजना सुरु करण्यात आली आहे. उपरोक्त विमा योजनेसाठी विद्यार्थिनीकडून रु. १००/- प्रतिवर्षी इतका विमा हप्ता जमा करुन घेण्यात येतो.

जर...

१) घरातून महाविद्यालयाकडे आणि परत महाविद्यालयाकडून घराकडे अशा कोणत्याही तऱ्हेने येताना/जाताना विद्यार्थिनीचा अपघात झाल्यास,

२) मान्यताप्राप्त शैक्षणिक सहली किंवा कॉलेजने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही शैक्षणिक किंवा कार्यालयीन कामासाठी जाताना/येताना अपघात झाल्यास,

३) विद्यार्थिनीस महाविद्यालयाच्या आवारात अपघात झाल्यास ही विमा जोखीम राहील.

१०) शिस्त व वर्तणूकविषयक नियम

१) शिस्त हे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे - विद्यार्थिनींचा अभ्यास, उपस्थिती व त्यांचे महाविद्यालयातील व बाहेरील वर्तन याबाबतीत महाविद्यालयाने तयार केलेले सर्व नियम विद्यार्थिनींना बंधनकारक राहतील.

२) महाविद्यालयातील व्याख्यानांचे तास, प्रात्यक्षिके, शैक्षणिक उपक्रम, शारीरिक शिक्षणाचे तास व सर्व परीक्षांना नियमित हजर असणे हा महाविद्यालयाच्या शिस्तीचा भाग आहे.

३) विद्यार्थिनींना महाविद्यालयामध्ये उपस्थित असताना व महाविद्यालयाच्या वतीने संपन्न होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचे वेळी स्वत:चे ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक आहे.

४) शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक विद्यार्थिनीकडे आधार क्रमांक असणे अनिवार्य आहे. जर आधार कार्ड अद्ययावत नसेल तर कोणत्याही योजनांचा लाभ मिळणार नाही.

५) वर्ग सुरू असताना व्हरांड्यात किंवा महाविद्यालयाच्या आवारात रेंगाळता कामा नये व इतर वर्गांना आपल्या वर्तनाने त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थिनींव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात अगर इमारतीत परस्पर प्रवेश करता येणार नाही. (याची माहिती प्रत्येक विद्यार्थिनीने पालकांना देणे आवश्यक आहे.)

७) महाविद्यालयाच्या मालमत्तेची (उदा. भिंती, दरवाजे, काचा, फळा, डेस्क, संगणक, प्रयोगशाळेतील साहित्य इ.) प्रत्येकीने काळजी घ्यावी. मोडतोड क्षम्य ठरणार नाही.

८) सर्व विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये नियमित व वेळेवर उपस्थित रहावे.

९) महाविद्यालयाच्या आवारातील स्मारके व त्यालगत असलेल्या चौथऱ्यावर, व्हरांड्यात आणि वाहन तळावर लावलेल्या वाहनांवर बसू नये.

१०) विद्यार्थिनींच्या पोशाखासंदर्भात महाविद्यालयाची कोणतीही अट नाही. पण महाविद्यालयाच्या लौकिकास बाधा येणार नाही असा पोशाख व वर्तणूक विद्यार्थिनींची असावी.

११) विद्यार्थिनींच्या कोणत्याही अडचणी असल्यास (वैयक्तिक व शैक्षणिक) त्यांनी त्या संबंधित वर्गशिक्षक, मा. प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१२) सहल अथवा इतर शैक्षणिक उपक्रम आयोजित करीत असताना विद्यार्थिनींना मा. प्राचार्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३) **संस्थेच्या परिपत्रकानुसार विद्यार्थिनींना संस्थेच्या आवारात मोबाईलच्या गैरवापरास बंदी घालण्यात आलेली आहे. जर मोबाईलचा गैरवापर करताना आढळल्यास मोबाईल जप्त करुन रु. ५००/- दंड आकारण्यात येईल. वरील कोणत्याही गैरवर्तनाबद्दल मा. प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.**

११) अंतर्गत तक्रार निवारण समिती

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ या कायद्यानुसार महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. विद्यार्थिनींमध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक जाणीव जागृती निर्माण करणे आणि अशा प्रकारच्या तक्रारींचे निराकरण करणे ह्या करिता सदर समिती सक्रिय आहे.

१२) विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम २०१९ नुसार महाविद्यालयात विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणेत आला आहे. या कक्षामार्फत विद्यार्थिनींच्या तक्रारींचे निवारण केले जाते. या संदर्भातील नियम विद्यार्थिनींच्या मागणीनुसार कार्यालयातून उपलब्ध करून दिले जातील.

१३) रॅगिंग प्रतिबंधक नियम

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व यु.जी.सी. च्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'रॅगिंग' हा दखलपात्र गुन्हा आहे. महाराष्ट्र शासन रॅगिंग प्रतिबंधक नियम १९९१ नुसार. रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थिनींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रत्येक घटनेबाबत अत्यंत कडक रितीने नियमांची अंमलबजावणी महाविद्यालयाकडून केली जाईल. त्याकरिता महाविद्यालयात ॲण्टी रॅगिंग सेल, ॲण्टी रॅगिंग स्क्वॉड, मोनिटरींग सेल व मेंटोरिंग सेलची स्थापना करण्यात आली आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे नोडल ऑफिसरची नियुक्ती केली आहे. तसेच प्रत्येक विद्यार्थी व पालकास त्यासंदर्भात शपथपत्रे भरुन देणे अनिवार्य आहे. सदरचे शपथपत्र www. antiragging.in या संकेत स्थळावर ऑनलाईन भरून त्याची प्रिंटआऊट कार्यालयात सादर करावी. रॅगिंग प्रतिबंधक कायदा माहितीपत्रकात स्वतंत्र पानावर दिलेला आहे.

१४) तक्रार निवारण समिती

विद्यार्थिनींच्या वैयक्तिक अथवा इतर समस्यांचे निराकरण करण्याकरिता तक्रार निवारण समितीची स्थापना महाविद्यालयात करण्यात आली आहे. तरी त्या संबंधी विद्यार्थिनींनी व पालकांनी समस्यांचे निराकरण करण्याकरिता समिती सदस्यांना भेटावे. आपण सांगितलेली सर्व माहिती गोपनीय ठेवण्यात येईल. तसेच वरील अडचणींसंदर्भात महाविद्यालयात सूचना पेटी ठेवण्यात आली असून विद्यार्थिनींच्या उपयुक्त सूचना विचारात घेतल्या जातील.

१५) विद्यापीठ विविध कल्याणकारी योजना

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींकरिता असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याकरिता सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाचे संकेतस्थळावरील www.unishivaji.ac.in → STUDENTS → Students Welfare → Department of Students Welfare या पानावरील माहिती पाहता येईल.

१६) आधार कार्ड क्रमांक

शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक विद्यार्थिनीकडे आधार कार्ड क्रमांक असणे अनिवार्य आहे.

१७) मतदार कार्ड

१८ वर्षावरील सर्व विद्यार्थिनींकडे मतदार कार्ड असणे अनिवार्य आहे. ज्यांचे मतदार कार्ड नसेल त्यांनी कार्यालयातून मतदार कार्ड नोंदणीसाठी आवश्यक फॉर्म घेऊन त्यामधील माहितीची पूर्तता करून त्वरीत तो कार्यालयात जमा करावा.

१८) प्रवेश मार्गदर्शन समिती

प्रवेशासंबंधी अडचणींचे निराकरण करण्याकरिता प्रवेश मार्गदर्शन समितीची स्थापना महाविद्यालयात करण्यात आली आहे. तरी प्रवेशासंबंधी मार्गदर्शनासाठी सदर समितीकडे संपर्क साधावा.

१९) अध्यापन माध्यम आणि महाविद्यालयाची वेळ

अ.नं.	शाखा/विषय	अध्यापनाचे माध्यम	महाविद्यालयाची वेळ
१.	कला	मराठी	सकाळी ७.३० ते १२.३०
२.	वाणिज्य	मराठी	सकाळी ७.३० ते १२.३०
	रविवार साप्ताहिक सुट्टी राहील.		

२०) करिअर ओरिएंटेड कोर्सेस

यु.जीसी.च्या करियर ओरिएण्टेड प्रोग्राम्स्अंतर्गत महाविद्यालयास खालील कोर्स सुरू करण्यासाठी मान्यता प्राप्त झालेली असून त्याचे नियमित वर्ग सुरू आहेत.

१) योगा एज्युकेशन ॲण्ड हेल्थ
२) डाइटेटिक्स ॲण्ड हेल्थ एज्युकेशन
३) हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट
४) बेसिक कॉम्प्युटर ॲण्ड इनफर्मेशन टेक्नॉलॉजी
५) ब्युटीकल्चर ॲण्ड थेरपी
६) सर्टिफिकेट कोर्स इन कम्युनिकेशन स्किल्स् इन इंग्लिश
७) सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटराईज्ड अकौंटिंग

महिला-सबलीकरण (Empowerment of Women) हे ध्येयविधान (Vision) असणाऱ्या कमला महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम पूर्ण करत असताना विद्यार्थिनींना व्यावसायिक शिक्षण मिळावे व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होता यावे ह्या उद्देशाने महाविद्यालयाने विविध कोर्सेस सुरु केलेले आहेत. विद्यार्थिनींची कोर्सेससाठी असणारी पसंती, व्यावसायिक शिक्षणाची गरज, रोजगाराची उपलब्धता इ. घटक लक्षात घेऊनच सर्व कोर्सेस सुरु करण्यात आलेले आहेत. सदर कोर्सेस शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचे (UGC) अर्थसहाय्य मिळालेले आहे. म्हणूनच अत्यल्प फीमध्ये व्यावसायिक शिक्षण घेण्याची अमूल्य संधी विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयाने दिलेली आहे. आज अनेक विद्यार्थिनी सदर कोर्सेस पूर्ण करून विविध क्षेत्रात कार्यरत असून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनलेल्या आहेत. सदर कोर्सेस खालीलप्रमाणे :

१) सर्टिफाईड कोर्स इन हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट

आजच्या स्पर्धेच्या युगात मानवाने आर्थिक व भौतिक प्रगती केली असली तरीही आरोग्य हानी हा एक चिंतेचा विषय बनलेला आहे. आज असाध्य अशा रोगग्रस्तांची यादी वाढत असून आरोग्य केंद्रे व रूग्णालयांची नितांत गरज निर्माण झालेली आहे. कोल्हापूर शहराचा विचार करता रुग्णालय संख्या ३० तर

प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या ७१ हून अधिक आहे. अशा सर्व रूग्णालय व आरोग्य केंद्राचे प्रशासन आणि व्यवस्थापन ही काळाची गरज बनलेली आहे म्हणूनच हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट ह्या कोर्सची संरचना करण्यात आलेली आहे. प्रशिक्षित प्रशासक व व्यवस्थापकाची गरज प्रत्येक रुग्णालयास असल्यामुळे ह्या कोर्सपूर्तीनंतर व्यवसायाची संधी विद्यार्थिनींना मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. सदर कोर्सद्वारे आरोग्य सुविधा, रूग्णालय व्यवसायाची माहिती प्राप्त होते तसेच व्यवस्थापन, रूग्णालय संघटन व व्यवसाय कौशल्य प्राप्त होते. पदवी व सर्टिफिकेट कोर्स एकाचवेळी करून आर्थिक स्वावलंबन साध्य होते.

कोर्स शुल्क रु. ५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. सागर वाळवेकर (समन्वयक)

२) सर्टिफिकेट कोर्स इन डायटेटिक्स ॲण्ड हेल्थ एज्युकेशन

आजच्या धावपळीच्या युगात आहाराकडे सर्वात जास्त दुर्लक्ष होत आहे. जे शरीरासाठी पोषक व आवश्यक आहे ते न खाता जे आवडेल व सहज उपलब्ध असेल ते खाण्याकडे सर्वांचा कल असतो. परिणामी शरीर स्वास्थ्याची अपरिमित हानी होत आहे. विविध प्रकारच्या आरोग्य समस्या निर्माण होतात. अशा समस्या होऊ नयेत व झाल्याच तर त्यावर आहाराद्वारे नियंत्रण ठेवण्यासाठी आहारातील पोषक घटकांची माहिती असणे आवश्यक असते म्हणूनच आहारोपचारशास्त्र आणि आरोग्य शिक्षण विद्यार्थिनींना देण्यासाठी सर्टिफिकेट कोर्स इन डायटेटिक्स ॲण्ड हेल्थ एज्युकेशन हा कोर्स सुरू करण्यात आलेला आहे. ह्या कोर्सद्वारे विद्यार्थिनींना आहारशास्त्राचे उपयुक्त ज्ञान मिळते ज्याचा उपयोग स्वतःसाठी व कुटुंबासाठी तर होतोच त्याचबरोबर हेल्थ सेंटर्स, व्यायामशाळा, रूग्णालये इ. ठिकाणी आहारोपचार सल्लागार म्हणून रोजगार संधी प्राप्त होते.

कोर्स शुल्क रु. ५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. अश्विनी कुंभार (समन्वयक)

३) सर्टिफिकेट कोर्स इन योगा एज्युकेशन ॲण्ड हेल्थ

योग हे भारतीय पारंपारिक शास्त्र आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील योगाचे महत्व लक्षात घेता तज्ञ योगशिक्षकांची गरज निर्माण झालेली आहे. आजच्या तणावयुक्त जीवनशैलीमध्ये योगशास्त्राचे शास्त्रशुद्ध शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयाने सर्टिफिकेट कोर्स इन योगा एज्युकेशन ॲण्ड हेल्थ सुरू केलेला आहे. सदर कोर्सद्वारे विद्यार्थिनींना शरीर स्वास्थ्याबरोबर मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता, बुद्धिसंवर्धनाबरोबरच कार्यकुशलता प्राप्त होऊ शकते. तसेच अनेक व्याधींवर योगाचा उपचारात्मक उपयोग केला जात असल्याने प्रशिक्षित योगशिक्षकांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता निर्माण झालेली आहे. सदर कोर्सद्वारे विद्यार्थिनींना योग-शिक्षक म्हणून रोजगार तसेच शिबिराचे आयोजन करून स्वयंरोजगारही प्राप्त होऊ शकतो. योग हा विषय माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक व महाविद्यालय स्तरावर शिकविला जात असल्यामुळे योगशिक्षक म्हणून तेथेही विद्यार्थिनींना संधी प्राप्त होऊ शकले.

कोर्स शुल्क रु. ५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. सुनिता काळे (समन्वयक)

४) सर्टिफिकेट कोर्स इन बेसिक कॉम्प्युटर ॲण्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी

२१ व्या शतकाने आपणाला माहितीच्या युगात आणले आहे. संगणक व इंटरनेटच्या जाळ्याने आपले जीवन संपूर्णपणे बदलले आहे आणि ज्ञान, माहिती, कार्य, रोजगार, व्यवसाय व करमणुकीच्या क्षेत्रात अनेक नव्या संधी निर्माण केल्या आहेत. ज्ञानाच्या या युगात टिकून राहण्यासाठी आणि करिअरमध्ये प्रगती करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची साक्षरता ही आवश्यक बनत चालली आहे. विद्यार्थिनींना संगणक हाताळणीचे प्रात्यक्षिक ज्ञान देऊन त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या मुलभूत संकल्पना स्पष्ट करून देण्यासाठी आमच्या महाविद्यालयात सर्टिफिकेट कोर्स इन बेसिक कॉम्प्युटर ॲण्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. कोणत्याही नोकरी अथवा व्यवसायासाठी कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक असल्याने विद्यार्थिनींना हा कोर्स निश्चितच उपयोगी ठरेल. रोजगाराबरोबरच स्वयंरोजगाराची संधी ह्या कोर्समुळे प्राप्त होऊ शकते.

कोर्स शुल्क रु. ५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. वर्षा मैंदर्गी (समन्वयक)

५) सर्टिफिकेट कोर्स इन ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी

व्यक्तिमत्व विकासात शारीरिक आरोग्यबरोबर सौंदर्यसंवर्धन ही काळाची गरज बनत चालली आहे. समाजातील सर्व स्तरांमध्ये ह्याबाबत जागरूकता निर्माण झालेली आढळते. परिणामी शहर आणि खेड्यापाड्यांमध्येही ब्युटी पार्लर्सच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. आंतरिक सौंदर्याबरोबरच बाह्य सौंदर्य खुलविण्यासाठीची आजच्या काळाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थिनींना सौंदर्यशास्त्र व सौंदर्य उपचाराची शास्त्रशुद्ध माहिती देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. या कोर्सद्वारे विद्यार्थिनींना स्वतःच्या सौंदर्याचे संवर्धन करता येईल त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराची संधी प्राप्त होईल..

कोर्स शुल्क रु. १५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. वर्षा साठे (समन्वयक)

६) सर्टिफिकेट कोर्स इन कम्युनिकेशन स्किलस् इन इंग्लिश

जागतिकीकरणाच्या या युगामध्ये इंग्रजी भाषेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. जगातील जवळजवळ सर्व देशांमध्ये आज इंग्रजी भाषेचा वापर संपर्काची व संदेश आदान-प्रदान करण्याची भाषा म्हणून केला जात आहे. प्रभावीपणे व अस्खलीतपणे आपले विचार मांडणे ही एक कौशल्याची बाब आहे. नोकरीची संधी किंवा स्वत:च्या पायावर उभे करू शकण्यासाठी क्षमता या भाषेमध्ये आहे. म्हणूनच आम्ही Communication Skills in English हा सर्टिफिकेट कोर्स सुरु केला आहे. सदर कोर्समध्ये अचूक उच्चार, शब्दावर योग्य पद्धतीने द्यावयाचा जोर, योग्य वाक्यरचना, योग्य व अचूक बोलणे व संप्रेषण (Communication) करताना घ्यावयाची काळजी इ. बाबींवर मार्गदर्शन केले जाते.

कोर्स शुल्क रु. १०००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. नीता धुमाळ (समन्वयक)

७) सर्टिफिकेट कोर्स इन कॉम्प्युटराईज्ड अकौंटिंग

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बँका, विविध कंपन्या, कार्यालये यामध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. त्यामुळे Computerised Accounting क्षेत्रात विद्यार्थिनींसाठी रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत. त्या अनुषंगाने आकडेवारीची सुरक्षितता, संगणकीय भाषा, फाईल मॅनेजमेंट, रिपोर्ट व कंपनी Data तयार करणे, Tax base Software ची माहिती आणि त्याचे प्रात्यक्षिक याची विद्यार्थिनींना माहिती देण्यासाठी Computerised Accounting हा सर्टिफिकेट कोर्स महाविद्यालयात सन २०१३-१४ पासून सुरू आहे. हा कोर्स केल्यानंतर विद्यार्थिनींना स्थानिक क्षेत्रातही अनेक रोजगार व स्वयंरोजगार संधी उपलब्ध होऊ शकतात.

कोर्स शुल्क रु. ५००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. वर्षा मैंदर्गी (समन्वयक)

सर्व कोर्सेससाठी कालावधी : एक वर्ष

प्रवेश : जुलै महिन्याच्या पहिल्या सप्ताहात

पात्रता : महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या

अ) बी. ए. - १, २, ३ व

ब) बी. कॉम. - १, २, ३ च्या विद्यार्थिनी

क) शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण पदवी अभ्यासक्रमास नोंदणी केलेल्या विद्यार्थिनी

विषय व गुण : १) पेपर क्र. १-१०० गुण

२) पेपर क्र. २-१०० गुण

३) पेपर क्र. ३ (प्रात्यक्षिक) १०० गुण

वेळापत्रक : ६ तासिका प्रति सप्ताह

परीक्षा : शिवाजी विद्यापीठ वार्षिक परीक्षेनंतर

परीक्षा केंद्र : कमला कॉलेज, कोल्हापूर

प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी संबंधित समन्वयकांशी संपर्क साधावा.

डिप्लोमा इन ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी

सौंदर्य हा नुसता शब्द नसून त्याला खूप गहिरा अर्थ आहे. अतिशय चित्तवेधक व्यक्तीमत्व ही जीवनात पुढे जाण्यासाठी आवश्यक अशी गोष्ट झाली आहे. हा एक उद्योजकता निर्माण करणारा, करिअर व कौशल्यावर आधारित कोर्स आहे. थिअरी व प्रात्यक्षिकांमुळे, उत्तम ज्ञान व कौशल्य आधारित ब्युटी कल्चर व थेरपी शिकल्यामुळे विद्यार्थी उत्तम त-हेने स्वतःचे ब्युटी पार्लर चालवू शकतात. हा कोर्स केल्यानंतर सौंदर्य शास्त्राचे उत्तम ज्ञान, मेकअप टेक्निक, त्वचा व केसांचे उपचार,

ट्रीटमेंट व सौंदर्यीकरण उत्तम त-हेने करता येते. प्रगत मशिनरीचा वापर करून सौंदर्य निर्माण करण्यामुळे ब्युटी इंडस्ट्रीत स्थिरावण्याचा आत्मविश्वास मिळतो. आजचा काळ हा ब्युटी इंडस्ट्रीचा भरभराटीचा काळ आहे. ब्युटी ट्रीटमेंट ही स्त्रिया व पुरुषांसाठी वेगवेगळी गरज राहिली नाही, तर सर्वांसाठी आवश्यक बाब बनली आहे.

कोर्सकरिता पात्रता - १२ वी पास (कोणत्याही शाखेतून)
कोर्स कालावधी - १ वर्ष (आठवड्यातून ३ दिवस)
कोर्सची फी - ५०००/- रु.
- ३०००/- रु. (कमला कॉलेज विद्यार्थिनींकरिता)

कोर्समुळे करिअर संधी

- स्वत:चे ब्युटी पार्लर/शॉप
- हेल्थ क्लबमध्ये ब्युटीशियन
- स्पा सेंटरमध्ये रोजगार संधी
- शैक्षणिक संस्थेत ब्युटी ट्रेनर किंवा पर्सनॅलिटी ग्रुमर
- ब्युटी प्रॉडक्ट बनविणे (उद्योजकता)

कोर्सचे पेपर

१) पेपर १ - ब्युटी ट्रिटमेंट व टेक्निक - १०० मार्क
२) पेपर २ - ॲनॉटॉमी व ब्यूटी कल्चर - १०० मार्क
३) पेपर ३ - बेसिक प्रॅक्टिकल इन ब्युटी ट्रिटमेंट - १०० मार्क
४) पेपर ४ - ॲडव्हान्स प्रॅक्टिकल इन ब्युटी थेरपी - १०० मार्क

एकूण - ४०० गुण थेअरी - २०० गुण प्रात्यक्षिक - २०० गुण

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. वर्षा साठे (समन्वयक)

---

२१) कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रम (कौशल्य विकास केंद्र सर्टिफिकेट कोर्सेस)

विद्यार्थिनींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात अल्प कालावधीचे पुढील विविध १७ कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कोर्सचे नाव	कालावधी/महिने	फी/रुपये
ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी	**१ वर्ष** **६ महिने** (जुलै ते डिसेंबर)	१,५००/- १,०००/-
नेल आर्ट	**१० दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते १० तारीख)	२००/-
मेहंदी डिझाईन	**६ दिवस** (प्रत्येक महिन्यात ११ ते १६ तारीख)	२००/-
हेअरकटींग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात २० ते २५ तारीख)	३००/-

हेअर स्टाईल	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात २५ ते ३० तारीख)	३००/-
साडी ड्रेपिंग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात १५ ते २० तारीख)	२००/-
बेसिक मेकअप	**२ दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते २ तारीख)	१००/-
पार्टी मेकअप	**५ दिवस (**प्रत्येक महिन्यात १ ते ५ तारीख)	२००/-
पर्सनल ग्रुमिंग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात ११ ते १६ तारीख)	२००/-
स्कीन पॉलिशिंग	**५ दिवस (**प्रत्येक महिन्यात १ ते ५ तारीख)	३००/-
ब्युटी पार्लर मॅनेजमेंट	**१ महिना (**प्रत्येक महिन्याला)	५००/-
बेसिक ब्युटीशियन	**३ महिने** (प्रत्येक ३ महिन्याला)	१,५००/-
पेडिक्युअर	**५ दिवस** (प्रत्येक महिन्याला)	२००/-
मॅनिक्युअर	**५ दिवस** (प्रत्येक महिन्याला)	२००/-
डिप्लोमा कोर्सेस		
कोर्सचे नाव	**कालावधी/महिने**	**फी/रुपये**
ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी	**१ वर्ष**	५,०००/-
हेअर स्टाईल आणि ट्रीटमेंट	**६ महिने** (ऑगस्ट ते जानेवारी)	२,५००/-
नेल आर्ट डिझाईन आणि ट्रीटमेंट	**३ महिने** (फेब्रुवारी) **१ महिना** (एप्रिल)	१,०००/- ३००/-
बॉडी पॉलिशिंग	**१ महिना** (मार्च व ऑक्टोंबर)	५००/-
पेडिक्युअर मॅनेक्युअर	**१ महिना** (ऑक्टोंबर, एप्रिल, जुलै)	२००/-
अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. अश्विनी कुंभार - ८८६२०६२६१०, प्रा. तृप्ती माने - ९८८१०१३९०१, संजना जाधव - -९०२१३५६००६		

२२) अभ्यासक्रमाची लवचिकता (Academic Flexibility)

अभ्यासक्रमाची लवचिकता सुविधेअंतर्गत १२ वी कॉमर्स, १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थिनी बी. ए. भाग १ साठी प्रवेश घेऊ शकतात. तसेच कमला कॉलेज (स्वायत्त) पदवी अभ्यासक्रम शिकत असताना शिवाजी विद्यापीठ दूरस्थ शिक्षण व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थिनी प्रवेश घेऊ शकतात व एकाचवेळी दोन शाखेच्या पदवी संपादन करू शकतात.

(Annexure-I)

KAMALA COLLEGE,KOLHAPUR(AUTONOMOUS)

Affiliated to SHIVAJI UNIVERSITY,KOLHAPUR

NEP - 2020 : Credit Framework For UG (B.A. & B. Com.) Programmes Under Faculty of HUMANITIES

SEM (Level)	COURSES			OE	VSC/SEC	AEC/VEC/IKS	OJT/FT/CEP/CC/RP	Total Credits	
	Course-1	Course-2	Course-3						
SEMI (4.5)	DSC-I (4)	DSC-I (4)	DSC-I(4)	OE-1(2)	SEC-I(2)	AEC-ENG-I(2) IKS Generic(2)	CC(2)	22	UGCertificates44
SEMII (4.5)	DSC-II(4)	DSC-II(4)	DSC-II(4)	OE-2(2)	SEC-II(2)	AEC-ENG-II(2) VEC - DEC (2)	CEP(2)	22	
Credits	4+4=8	4+4=8	4+4=8	2+2=4	2+2=4	4+4=8	2+2=4	44	ExitOption:4credit Skill/NSQF/Internship
	MAJOR		MINOR						
	MAJOR	ELECTIVE							
SEMIII (5.0)	MAJOR-III(4) MAJOR-IV(4)	-	MINOR-(4)	OE-3(2)	VSC-I(2) SECIII (02)	AEC-ENG-III(2) IKS Specific (2)	-	22	UGDiploma88
SEMIV (5.0)	MAJOR-V(4) MAJOR-VI(4)	-	MINOR-(4)	OE-4(2)	VSC-II (2) SECIV(02)	AEC-ENG-IV(2) VEC-EVS (2)	-	22	
Credits	8+8=16		4+4=8	2+2=4	4+4=8	4+4=8	-	44	ExitOption:4credit Skill/NSQF/Internship
SEMV (5.5)	MAJOR-VII (4) MAJOR-VIII(4) MAJOR-IX (2)	MAJOR-EL-1(4)	MINOR-(4)	OE-5(2)	-	-	FP-(02)	22	UGDegree 132
SEMVI (5.5)	MAJOR-X (4) MAJOR-XI (4) MAJOR-XII(2)	MAJOR-EL-1I(4)	MINOR-(4)	-	-	-	OJT- (04)	22	
Credits	10+10=20	4+4=08	4+4=08	2+0=2	-	-	2+4=6	44	
Total Credits	8+16+20+8+8		8+8+8	4+4+2	4+8	8+8	4+6		
	60		24	10	12	16	10	132	

SEMVII (6.0)	MAJOR-XIII (4) MAJOR-XIV (4) MAJOR-XV (4) MAJOR-XVI (2)	MAJOR-EI-3(4)	RM-I(4)	-	-	-	-	22	Four Year UG Honours Degree 176
SEMVIII (6.0)	MAJOR-XVII (4) MAJOR-XVIII (4) MAJOR-XIX (4) MAJOR-XX (2)	MAJOR-EI-4(4)	-	-	-	-	OJT (04)	22	
Credits	14+14=28	4+4=08	4+0=4	-	-	-	0+4=4	44	
Total Credits	60+28+8								
	96		28	10	12	16	14	176	
SEMVII (6.0)	MAJOR-XXI (4) MAJOR-XXII (4) MAJOR-XXIII (2)	MAJOR-EI-3(4)	RM-I(4)	-	-	-	RP-(4)	22	Four Year UG Honours With Research Degree 176
SEMVIII (6.0)	MAJOR-XXIV (4) MAJOR-XVX (4) MAJOR-XXVI (2)	MAJOR-EI-4(4)	-	-	-	-	RP-(8)	22	
Credits	10+10=20	4+4=08	4+0=04	-	-	-	4+8=12	44	
	60+20+8								
Total Credits	88		28	10	12	16	22	176	

Note:

- University may decide to offer maximum of three subjects (Courses) in the first year. The student may select one subject out of combination of three subjects (Courses), (which a student has chosen in the first year) as a **MAJOR** subject (Course) and one subject (Course) as **MINOR** Subject in the second year. Thereby it is inferred that the remaining third subject (Course) shall stand discontinued.
- **MAJOR:** Mandatory/Elective
- **MINOR:** Course may be from different disciplines of same faculty of DSC Major
- **OE (Open Elective):** Elective courses/**Open Elective to be chosen compulsorily from faculty other than that of the Major.**
- **VSC/SEC: Vocational Skill Courses (MAJOR related)/Skill Enhancement Courses**
- **AEC/VEC/IKS:** Ability Enhancement Courses (English, Modern Indian Language)/Value Education Courses (Sem. III-Democracy, Elections & Indian Constitution, (DEC) Sem. IV– Environmental Studies (EVS)/Indian Knowledge System (Generic & Specific))
- **OJT/FP/RP/CEP/CC:** On-Job Training (Internship/Apprenticeship)/Field Project (Major related)/Research Projects (Major related) Community Engagement **(Major related)/Co-Curricular courses (CC)** such as Health & Wellness, Yoga Education, Sport, and Fitness, Cultural activities, NSS/NCC and Fine /applied/visual/performing Arts/Vivek Vahini etc.

वाणिज्य विद्याशाखा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पदवी अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक आराखडा संदर्भातील दि. २०/४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये बी. कॉम. भाग १ साठी खालीलप्रमाणे विषय राहतील.

B. Com - I
Semester - I
As per NEP 2020

Course Code	Subject Code	Subject	Credits	Marks
C-101	Course-DSC I	Financial Accounting p. I	4	80+20
C-102	Course-DSC I	Management Principles and Applications p. I	4	80+20
C-103	Course-DSC I	Micro Economics p. I	4	80+20
C-104	O.E. I	Writing Skills in India p.I / Marketing p.I/ Marathi p. I	2	40+10
C-105	SEC I	Insurance Skills p.I/ Marketing Skills p.I	2	50
C-106	AECC I	Business Communication p.I	2	40+10
C-107	IKS I	Indian Management I	2	40+10
C-108	CC I	Sports/ NSS/ NCC/ Yoga	2	30+20
		Semester- II		
Course Code	**Subject Code**	**Subject**	**Credits**	**Marks**
C-201	Course-DSC II	Financial Accounting p. II	4	80+20
C-202	Course-DSC II	Management Principles and Applications p. II	4	80+20
C-203	Course-DSC II	Micro Economics p. II	4	80+20
C-204	O.E. II	Writing Skills in India p.II / Marketing p.II/ Marathi p. II	2	40+10
C-205	SEC II	Insurance Skills p.II/ Marketing Skills p.II	2	50
C-206	AECC II	Business Communication p.II	2	40+10
C-207	VEC I	Democracy, Election and Good Governance	2	50
C-208	CEP	Sports/ NSS/ NCC/ Yoga	2	30+20

B. Com - II Semester - III				
Course Code	**Subject Code**	**Subject**	**Credits**	**Marks**
MJ V	201	Corporate Accounting I	4	80+20
MJ VI	202	Entrepreneurial Finance I	4	80+20
MN II	203	Statistics for business management - I	4	80+20
OE (ME)- III	204	Macro Economics	2	40+10
OE (MFS) - III	205	Money and Financial System	2	40+10
OE-III	206	Media and writing skills I	2	40+10
VSC (BF) III	207	Banking and Finance	2	40+10
VSC (IB) III	208	International Business	2	40+10
AEC-III	209	Business Communication	2	40+10
FP I	210	Field Project on Accountancy	2	40+10
CC III	211	NSS	2	40+10
CC III	212	NCC	2	40+10
CC III	213	Sports	2	40+10
CC III	214	Yoga	2	40+10

Note : 1. Students have to choose one subject from 4 and 6
2. Students have to choose one subject from 7 & 8
3. Subjects serial number 1,2 3,9 and 10 are compulsory for all the students.
4. Students have to choose any one subject from 11, 12,13& 14.

B. Com - II Semester - IV				
Course Code	**Subject Code**	**Subject**	**Credits**	**Marks**
MJ VII	215	Corporate Accounting II	4	80+20
MJ VIII	216	Entrepreneurial Finance II	4	80+20
MN III	217	Statistics for Business management - II	4	80+20
OE (PF) - IV	218	Public Finance	2	40+10
OE (BFI) - IV	219	Banks and Financial Institutions	2	40+10
OE- IV	220	Media and writing skills II	2	40+10
SEC (MBP)-III	221	Modern Banking Practices	2	40+10
SEC (BIT)- III	222	Basics in International Trade	2	40+10

AEC-IV	223	Business Communication & Soft Skills	2	40+10
FP II	224	Field Project on Accountancy	2	40+10
CC IV	225	NSS	2	40+10
CC IV	226	NCC	2	40+10
CC IV	227	Sports	2	40+10
CC IV	228	Yoga	2	40+10

Note: 1. Students have to choose one subject from 4 and 6
2. Students have to choose one subject from 7 & 8
3. Subjects serial number 1,2 3,9 and 10 are compulsory for all the students.
4. Students have to choose any one subject from 11, 12,13 & 14.

B. Com III

Semester V

Course Code	Subject Code	Subject	Credits	Marks
301	DSC 15	Business Regulatory Framework p.I	4	40+10
302	DSC 17	Business Environment p.I	4	40+10
304	DSC 19	Co-Operative Development p.I	4	40+10
305	DSC 21	Modern Management Practices p.I	4	40+10
306	DSE 1	Advanced Accountancy p.I	4	40+10
307	DSE 2	Advanced Accountancy p.II	4	40+10
308	DSE 1	Industrial Management p.I	4	40+10
309	DSE 2	Industrial Management p.II	4	40+10

Semester VI

Course Code	Subject Code	Subject	Credits	Marks
310	DSC 16	Business Regulatory Framework p.II	4	40+10
311	DSC 18	Business Environment p.II	4	40+10
312	DSC 20	Co-Operative Development p.II	4	40+10
313	DSC 22	Modern Management Practices p.II	4	40+10
314	DSE 3	Advanced Accountancy p.III	4	40+10
315	DSE 4	Advanced Accountancy p.IV	4	40+10
316	DSE 3	Industrial Management p.III	4	40+10
317	DSE 4	Industrial Management p.IV	4	40+10

कला विद्याशाखा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पदवी अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक आराखडा संदर्भातील दि. २०/४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये बी. ए. भाग १ साठी खालीलप्रमाणे विषय राहतील.

बी. ए. Level - 4.5 (प्रथम वर्ष) प्रथम सत्र

1. Discipline Specific Course							
विषय एक	कोर्स कोड	विषय दोन	कोर्स कोड	विषय तीन	कोर्स कोड	क्रेडीटस्	गुण
हिंदी	DSC- 1- 101	समाजशास्त्र	DSC- 1- 103	मराठी	DSC- 1- 106	4	80+20
इंग्रजी	DSC- 1- 102	अर्थशास्त्र	DSC- 1- 104	इतिहास	DSC- 1- 107	4	80+20
		गृहशास्त्र	DSC- 1- 105	मानसशास्त्र	DSC- 1- 108	4	80+20
वरील तक्त्यामधील विषय एक, दोन, तीन मधील प्रत्येकी एक विषय निवडावा.							
2. Open Elective (OE)							
हिंदी	OE - 1- 109	मराठी	OE- 1- 110	विज्ञान तंत्रज्ञान प्रगती (S.T.D.)	OE- 1-111 109	2	40+10
वरील तक्त्यामधील एक विषय निवडावा.							
3. Skill Enhancement Course (SEC)							
Personality Development Skill SEC-I-112						2	50
4. Ability Enhancement Course (AEC)							
English - AEC-I-113						2	40+10
5. Indigenous Knowledge System (IKS)							
Indigenous Knowledge System (Generic) IKS-I-114						2	40+10
6. Co-Curricular Courses(CC)							
NCC-CC I- 115						2	30+20
NSS-CC I- 116						2	30+20
Sports-CC I- 117						2	30+20
Yoga-CC I- 118						2	30+20

बी. ए. Level - 4.5 (प्रथम वर्ष) द्वितीय सत्र

1. Discipline Specific Course							
विषय एक	कोर्स कोड	विषय दोन	कोर्स कोड	विषय तीन	कोर्स कोड	क्रेडीटस्	गुण
हिंदी	DSC- 2- 201	समाजशास्त्र	DSC- 2- 003	मराठी	DSC- 2- 206	4	80+20
इंग्रजी	DSC- 2- 202	अर्थशास्त्र	DSC- 2- 204	इतिहास	DSC- 2- 207	4	80+20
		गृहशास्त्र	DSC- 2- 205	मानसशास्त्र	DSC- 2- 208	4	80+20
वरील तक्त्यामधील विषय I, II, III मधील प्रत्येकी एक विषय निवडावा.							
2. Open Elective (OE)							
हिंदी	OE - 2- 209	मराठी	OE- 2- 210	विज्ञान तंत्रज्ञान प्रगती (S.T.D.)	OE- 2-211	2	40+10
वरील तक्त्यामधील एक विषय निवडावा.							
3. Skill Enhancement Course (SEC)							
Writing Skills SEC-I-212						2	50
4. Ability Enhancement Course (AEC)							
English - AEC-2-213						2	40+10
5. Value Education Course (VEC)							
Democracy, Elections and Good Governance - VEC-I-214						2	50
6. Community Engagement Program (CEP)							
Economics CEP I- 215						2	50
English-CEP I- 216						2	50
Home Science-CEP-I- 217						2	50
Hindi-CEP I- 218						2	50
Sociology- CEP- I- 219						2	50
U.G. Certificate Course						Total Credits- 22	

बी. ए. Level - 5 (द्वितीय वर्ष) तृतीय सत्र

Major

Major	Course code	Subject Code	Credits	Marks
Economics - III	DSC - MJ - 11	301	4	8+20
Economics - IV	DSC - MJ - 12	302	4	8+20
English- III	DSC - MJ - 13	303	4	8+20
English- IV	DSC - MJ - 14	304	4	8+20
Home Science- III	DSC - MJ - 15	305	4	8+20
Home Science- IV	DSC - MJ - 16	306	4	8+20
Hindi- III	DSC - MJ - 17	307	4	8+20
Hindi- IV	DSC - MJ - 18	308	4	8+20
Sociology- III	DSC - MJ - 19	309	4	8+20
Sociology- IV	DSC - MJ - 20	310	4	8+20

Minor

Minor	Course code	Subject Code	Credits	Marks
Economics	DSE - MN - 17	311	4	8+20
English	DSE - MN - 18	312	4	8+20
Home Science	DSE - MN - 19	313	4	8+20
Hindi	DSE - MN - 20	314	4	8+20
Sociology	DSE - MN - 21	315	4	8+20
Marathi	DSE - MN - 22	316	4	8+20
History	DSE - MN - 23	317	4	8+20
Psychology	DSE - MN - 24	318	4	8+20

OE

OE	Course code	Subject Code	Credits	Marks
Ecology	OE - 9	319	4	8+20
Co-operation	OE - 10	320	4	8+20
HSRM	OE - 11	321	4	8+20
Entrepreneurial Finance	OE - 12	322	4	8+20

AEC

AEC	Course code	Subject Code	Credits	Marks
English for Communication P - III	AEC - 3	323	2	40+10

SEC

SEC	Course code	Subject Code	Credits	Marks
Counselling	SEC - III	324	2	50
Skills For Happiness	SEC - IV	325	2	50

VAC

VAC	Course code	Subject Code	Credits	Marks
Environment Studies - I	VAC - I	326	2	50

बी. ए. Level - 5 (द्वितीय वर्ष) चतुर्थ सत्र

Major

Major	Course code	Subject Code	Credits	Marks
Economics - V	DSC - MJ - 21	401	4	8+20
Economics - VI	DSC - MJ - 22	402	4	8+20
English - V	DSC - MJ - 23	403	4	8+20
English - VI	DSC - MJ - 24	404	4	8+20
Home Science - V	DSC - MJ - 25	405	4	8+20
Home Science - VI	DSC - MJ - 26	406	4	8+20
Hindi - V	DSC - MJ - 27	407	4	8+20
Hindi - VI	DSC - MJ - 28	408	4	8+20
Sociology - V	DSC - MJ - 29	409	4	8+20
Sociology - VI	DSC - MJ - 30	410	4	8+20

Minor

Minor	Course code	Subject Code	Credits	Marks
Economics	DSE - MN – 25	411	4	8+20
English	DSE - MN – 26	412	4	8+20
Home Science	DSE - MN – 27	413	4	8+20
Hindi	DSE - MN – 28	414	4	8+20
Sociology	DSE - MN – 29	415	4	8+20
Marathi	DSE - MN – 30	416	4	8+20
History	DSE - MN – 31	417	4	8+20
Psychology	DSE - MN - 32	418	4	8+20

OE

OE	Course code	Subject Code	Credits	Marks
Ecology	OE - 13	419	4	8+20
